# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 01/04/2021 (गुरूवार)

(दुपार)

---

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. बेला :– अंतर्गत हैद्राबाद नागपुर हायवे एनएच–44, सोनेगाव ते पंजाबी ढाबा येथे दिनांक 17/03/2021 चे 06:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अखीलेश कुमार श्रीमस्तराम केसरी, वय 45 वर्ष, रा. कुन्डाजी प्रतापगढ (यु.पी.) हे केएल–13/एजे–1140 क्रमांकाची सिलेरिआ कारने पत्नी व दोन मुलांसह हैद्राबाद नागपुर हायवे रोडने आपले गावी जात होते. त्यादरम्यान अज्ञात क्रमांकाचा ट्रक चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रक अचानक कार चे समोर आणुन निष्काळजीपणे चालवून अचानक ब्रेक मारल्यामुळे फिर्यादीची गाडी मागुन ट्रकला जावुन धडकली. त्यामुळे फिर्यादीची पत्नी नामे– सीमा हिला गंभीर दुखापत झाल्याने तिला उपचारा कामी मिलट्री हॉस्पीटल कामठी येथे दाखल केले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. सदर ट्रक चालक हा पत्नी सीमा अखीलेश कुमार केसरी, वय 40 वर्ष, रा. कुन्डाजी प्रतापगढ (यु.पी.) हिचे मरणास कारणीभुत झाला. तसेच फिर्यादी व त्यांच्या दोन्ही मुलांना जखमी व गाडीचे नुकसान करण्यास आरोपी कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 427, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री ठेगणे मो कं 7972812569 हे करीत आहे.

### गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 15 कि.मी अंतरावर गजानन मंदीरचे मागे वार्ड क्र. 15 कळमेश्वर येथे दिनांक 30/03/2021 चे 07.30 वा. दरम्यान आरोपी क्र 1) अनिल गौतम याने आपल्या ताब्यातील बोलेरो पिकअप गाडीने फिर्यादी नामे– गुलाब तेंजबाहुदर यादव वय 38 वर्ष रा वार्ड क्र 15 कर्ण ले आउट प्लॉट क्र 20 कळमेश्वर यांचे घरासमोर ठेवलेल्या विटाना धडक देवुन त्याचे विटाचे नुकसान केले. फिर्यादीने सदर आरोपीस विटांचे नुकसान भरपाई मागीतल्याचे कारणावरून 1) अनिल गौतम 2) प्रदीप अंदरेले 3) उजागरसींग अंदरेले 4) बाबलसींग अंदरेले 5) कालु अंदरेले 6) पंचमी अंदरेले 7) किरण अंदरेले 8) भुऱ्या अंदरेले व 9) लखन अंदरेले, सर्व रा. कळमेश्वर यांनी गैरकायदयाची मंडळी गोळा करून फिर्यादीस अश्लिल शिवीगाळ करून फिर्यादीस व त्याच्या भावास विटांनी मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम 143,147,149,324,294 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. शिवाजी मुंडे 9403951236 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर